13 JAN 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक वंचितता केंद्राला दोन कोटी

## संशोधनाला मदत : 'यूजीसी'कडून शिवाजी विद्यापीठाला पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) दोन कोटी एक लाख ७२ हजार ४५९ रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. त्याचे पत्र विद्यापीठाला मिळाले आहे.

या अभ्यास केंद्राने स्थापनेपासून आजपर्यंत समाजातील वंचित, दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अल्पसंख्याक, अंधश्रद्धा निर्मूलन, आदी सामाजिक विषयांवर शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले आहेत. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे.

या केंद्रासाठीचा २०१२पासूनचा निधी यूजीसीकडे प्रलंबित होता. त्यानुसार २०१२-१३ ते २०१८-१९ कालावधीसाठीचा संपूर्ण निधी प्रदान करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले आहे. या निधीमुळे अभ्यास केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांस आणि वंचित घटकांच्या संदर्भातील संशोधन कार्यास गती मिळेल, असे या केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी बुधवारी सांगितले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी अभिवादन कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीने सहभाग घेऊन आदरांजली वाहिली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. कामत, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जी.एस. गोकावी, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम.एस. देशमुख, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जी.एस. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

13 JAN 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक वंचितता केंद्रास यूजीसीकडून २ कोटींचा निधी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्याकडून २ कोटी १ लाख ७२ हजार ४५९ रुपये निधी प्राप्त झाला. तसे पत्र नुकतेच विद्यापीठास प्राप्त झाले आहे. देशामध्ये सामाजिक वंचितता व समावेशन याबाबतचा अभ्यास सुरू व्हावा, या दृष्टीने अकराव्या व बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये याबाबत आर्थिक तरतूद करण्यात आली होती.

मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी देशभरामध्ये सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रांची निर्मिती केली आहे. संपूर्ण भारतात पहिल्या टप्प्यात एकूण १३ अभ्यास केंद्रांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली होती. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील केंद्राचा समावेश आहे. महाराष्ट्रात विद्यापीठीय स्तरावर कार्यरत असलेले ते एकमेव अभ्यास केंद्र आहे.

या अभ्यास केंद्राने स्थापनेपासून आजपर्यंत समाजातील वंचित, दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अल्पसंख्याक, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले आहेत. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही सुरू केला आहे. या अभ्यास केंद्रासाठीचा २०१२ पासूनचा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रलंबित होता. त्यानुसार २०१२-१३ ते २०१८-१९ कालावधीसाठीचा संपूर्ण निधी यूजीसीकडून प्रदान करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले आहे.

## संशोधन कार्यास गती

या निधीमुळे अभ्यास केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमास आणि वंचित घटकांच्या संदर्भातील संशोधन कार्यास गती मिळेल, असा विश्वास डॉ. कराडे यांनी व्यक्त केला.

13 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक वंचितता केंद्रास दोन कोटी

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रास विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्याकडून दोन कोटी एक लाख बहात्तर हजार चारशे एकोणसाठ रुपये इतका निधी मिळाला आहे. तसे पत्र नुकतेच विद्यापीठास प्राप्त झाले आहे.



भारतामध्ये सामाजिक वंचितता व समावेशन याबाबतचा अभ्यास सुरू व्हावा, या दृष्टीने अकराव्या व बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये याबाबत आर्थिक तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी देशभरामध्ये सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रांची निर्मिती केली आहे. संपूर्ण भारतात पहिल्या टप्प्यात एकूण १३ अभ्यास केंद्राना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली होती. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील केंद्राचा समावेश आहे. महाराष्ट्रात विद्यापीठीय स्तरावर कार्यरत असलेले ते एकमेव अभ्यास केंद्र आहे.

अभ्यास केंद्राने स्थापनेपासून आजपर्यंत समाजातील वंचित, दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अल्पसंख्याक, अंधश्रध्दा निर्मूलन इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले आहेत. त्याचबरोबरच सामाजिक वंचितता व समावेशक धोरण विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही सुरू केला आहे. या अभ्यास केंद्रासाठीचा सन २०१२ पासूनचा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रलंबित होता. त्यानुसार सन २०१२-१३ ते सन २०१८-१९ कालावधीसाठीचा संपूर्ण निधी युजीसीकडून प्रदान करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले आहे. केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी अभ्यास केंद्राचा प्रलंबित निधीसाठी पाठपुरावा केला. अभ्यास केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांस आणि वंचित घटकांच्या संदर्भातील संशोधन कार्यास गती मिळेल, असा विश्वास डॉ. कराडे यांनी व्यक्त केला.

13 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजमाता जिजाऊ, विवेकानंदांच्या विचारांचा जागर

**शहरातील शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांतर्फे राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी झाली. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.**

**शिवशक्ती प्रतिष्ठान परिवार**

अखंड हिंदुस्थानची प्रेरणा राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ४२४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. गंगावेस, धोत्री गल्ली येथील राजमाता हायस्कूलच्या प्रांगणातील माँसाहेब जिजाऊंच्या स्मारक परिसरात फुलांची सजावट केली. जिजाऊ माँसाहेब यांच्या मूर्तीस जलाभिषेक, पूजन, पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रेरणा मंत्राचे पठण करून जिजाऊंच्या, शिवरायांच्या घोषणा दिल्या. शिवशक्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातापा कडव, प्रशांत जाधव, राहुल केर्लेकर, प्रवीण कुरणे, प्रफुल्ल भालेकर, सौरभ कापडी, श्रेयस कुरणे, मनीष बदडारे, प्रणव नलवडे, गणेश मोरे, बंटी माने, शरद कर्लेकर, संताजी लाड आदी उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ**

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ऑनलाईन पद्धतीने सहभाग घेतला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, 'आयक्यूएसी'चे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जी. एस. कुलकर्णी उपस्थित होते. कोविड-१९ विषयक नियमावलीचे पालन करून कार्यक्रम झाला.

**नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय**

कळंबा येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांच्या हस्ते झाले. डॉ. मनीषा पाटील अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. ऊर्मिला पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्रीमती शुभांगी पाटील यांनी आभार मानले. प्रा. धनंजय चाफोडीकर, डॉ. आण्णासाहेब पाटील, वर्षा पाटील, कमलाकर गुरव, संतोष मिसाळ उपस्थित होते.

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण**

जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, महावीर कॉलेजतर्फे राष्ट्रीय युवक दिन ऑनलाईन झाला. श्री स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊंच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. मराठी विभागाचे प्रा. जयंत दळवी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव पंकज देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. विधीज्ञ किरण खटावकर यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रा. अरुण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**ग्राहक पंचायत कोल्हापूर महानगर**

महानगरचे संघटक सुहास गुरव यांनी प्रास्ताविक केले. सहसंघटक रवींद्र घाटगे यांनी सूत्रसंचालन केले. प्रसाद बुरांडे यांनी खेळघर अन् पंचायतीच्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. महानगर उपाध्यक्ष कमलाकर बुरांडे अध्यक्षस्थानी होते. १५ ते ३१ डिसेंबर पंधरवड्यात ग्राहक जागृती अभियानअंतर्गत पथनाट्य सादर केली. पथनाट्यमध्ये सहभागी झालेल्या खेळ घरातील मुलांना शालेय साहित्य वाटप केले. सुमेधा कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे विभागीय संचालक प्रभाकर पत्की, प्रशांत चौगुले, खेळ घरातील शिक्षिका सुमन राऊत, मुले उपस्थित होती. जुई कुलकर्णी, संदीप जंगम यांनी परिश्रम घेतले. सचिव विनायक वाळवेकर यांनी आभार मानले.

**तवनाप्पा पाटणे हायस्कूल**

स्वामी विवेकानंद, जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन पर्यवेक्षक सतीश भोसले यांच्या हस्ते झाले. यु. आर. देशपांडे यांनी स्वामी विवेकानंद, जिजाऊ यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. जिमखानाप्रमुख आर. एस. मांडरे उपस्थित होते. डी. सी. पाटील यांनी आभार मानले. एस. व्ही. हिरेमठ यांनी सूत्रसंचालन केले.

**श्री दत्ताबाळ मिशन डिव्हाईन**

श्री दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूल, श्री दत्ताबाळ प्राथमिक विद्यामंदिर, श्री दत्ताबाळ हायस्कूलतर्फे राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन सचिव नीलेश देसाई यांच्या हस्ते झाले. अध्यक्षा पल्लवी देसाई, संस्था व्यवस्थापक संदीप डोंगरे, मुख्याध्यापिका रोहिणी शेवाळे, किर्ती मिठारी, हायस्कूलचे मुख्याध्यापक सचिन डवंग उपस्थित होते.

**वि. स. खांडेकर प्रशाला**

सहायक शिक्षक चोपडे यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका कानकेकर अध्यक्षस्थानी होत्या. भित्तीपत्रकाचे उद्घाटन झाले. मुस्तफा मुल्ला, विराज आष्टूळ यांनी स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल माहिती दिली. सांस्कृतिक विभागप्रमुख वरक, डोणे, भोसले, रायकर, भिऊंगडे, कांबळे उपस्थित होते. पोवार यांनी सूत्रसंचालन केले. गुरव यांनी आभार मानले.

**श्री स्वामी विवेकानंद आश्रम**

साठमारी येथील स्वामी विवेकानंद जयंती झाली. जयश्री चंद्रकांत जाधव यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संस्थेचे अध्यक्ष आनंदराव पायमल, सचिव चंद्रकांत देसाई, विश्वस्त शिवाजी पोवार, सर्जेराव जरग, किरण अतिग्रे, कृष्णात बोडके, अमर साळोखे, किशोर टिपुगडे, संभाजीराव मगदूम, प्रकाश टिपुगडे, राहुल माळी, वैभव माने, राजेश बानदार, आनंदराव पाटील, शारदा माता-भगिनी मंडळाच्या संचालिका, कार्यकर्त्या उपस्थित होत्या. महिला वर्गाने पाळणा व प्रार्थना पठण केले.

13 JAN 2022

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक वंचितता अभ्यास केंद्रास युजीसीकडून दोन कोटी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी) २ कोटी १ लाख ७२ हजार ४५९ रुपये निधी अनुदान मिळाले आहे. युजीसीने नुकतेच पत्र विद्यापीठाला पाठवले आहे.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी देशभरामध्ये सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रांची निर्मिती केली आहे.

- **युजीसीकडून शिवाजी विद्यापीठाला नुकतेच पत्र**

संपूर्ण भारतात पहिल्या टप्प्यात एकूण १३ अभ्यास केंद्राना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली होती. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील केंद्राचा समावेश आहे. महाराष्ट्रात विद्यापीठीय स्तरावर कार्यरत असलेले ते एकमेव केंद्र आहे.

अभ्यास केंद्राने स्थापनेपासून आजपर्यंत समाजातील वंचित, दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग शेतकऱ्यांच्या



आत्महत्या, अल्पसंख्याक, अंधश्रध्दा निर्मूलन इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले आहेत. त्याचबरोबरच सामाजिक वंचितता व समावेशक धोरण विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही सुरू केला आहे. या अभ्यास केंद्रासाठीचा सन २०१२ पासूनचा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रलंबित होता. त्यानुसार सन २०१२-१३ ते सन २०१८-१९ कालावधीसाठीचा संपूर्ण निधी युजीसीकडून प्रदान करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले आहे. केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी अभ्यास केंद्राचा प्रलंबित निधी मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला. सदर निधीमुळे अभ्यास केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांस आणि वंचित घटकांच्या संदर्भातील संशोधन कार्यास गती मिळेल, असा विश्वास डॉ. कराडे यांनी व्यक्त केला.

तरुण भारत

## शिवाजी विद्यापीठात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊंना अभिवादन

शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जी. एम. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती

राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेस राष्ट्रवादीचे नितीन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. प्रविण कोडोलीकर, मंदार पाटील, विवेक कोकरे, ऋतुराज पाटील, संदीप पाटील, मयूर महारनूर, धनराज माने आदी उपस्थित होते.